**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | विठ्ठल बाळु वाघ, |
| वय | : | ३७ वर्षे, |
| पद | : | पोलीस हवालदार बक्कल नं.२४६६, घोडेगाव पोलीस स्टेशन |
| राहणार | : | घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे. |

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. घटनेवेळी माझी नेमणुक पोलीस नाईक म्हणुन घोडेगाव पोलीस स्टेशन येथे होती. गु.र.नं.२३६/२०२२ चा तपास वरीष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. सदर गुन्ह्यातील मोबाईल फिर्यादीने आणुन दिला. सदर मोबाईल आम्ही दोन पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याने जप्त केला. आता मला दि.१७/१०/२०२२ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२४** देण्यात येतो. त्यानंतर मी सदर मुद्देमालाची पावती तयार केली. आता मला दि.१७/१०/२०२२ रोजीची मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही व मुद्देमाल स्विकारणा-या अधिका-याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२५** देण्यात येतो.

२. त्यानंतर मी फिर्यादीच्या शेजारी राहणा-या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार लिलाबाई शिवाजी बार्वेकर यांच्याकडे तपास करुन त्यांचा जबाब नोंदविला. त्यानंतर इतर साक्षीदारांकडे तपास करुन त्यांचा जबाब नोंदविला. त्यानंतर मी घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दि.१९/१०/२०२२ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२६** देण्यात येतो. त्यानंतर आम्ही आरोपीला अटक करुन त्याच्याकडे मोबाईलच्या सिमकार्डबाबत तपास केला. आरोपीने सिमकार्ड तोडून फेकून दिले होते. मी जप्त केलेला

मोबाईल पाहिल्यास ओळखु शकतो. सदर मोबाईल फिर्यादीला परत केला आहे. तपासाअंती आरोपीने मोबाईल चोरीचा गुन्हा केला असे निष्पन्न झाले. तसेच आरोपीने मोबाईल पुन्हा फिर्यादीला आणुन दिला. आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. आय. सी. शेख</u>**

३. दि.१७/१०/२०२२ रोजी सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे आला. गुन्ह्याचा तपास सी.सी.टी.एन.एस. प्रणालीद्वारे सोपविला जातो. सदर सी.सी.टी.एन.एस. प्रणालीची प्रत दोषारोपपत्रासोबत दाखल केली आहे. गुन्हा दि.११/१०/२०२२ रोजी घडला. फिर्यादीने दि.१७/१०/२०२२ रोजी फिर्याद दाखल केली. फिर्यादीने उशिरा तक्रार दाखल केली कारण ते स्वतः मोबाईलचा शोध घेत होते. त्यांना आरोपीचे नाव माहित होते. आरोपीने त्यांना मोबाईल आणुन दिल्यानंतर फिर्यादीने तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने तक्रार दाखल केली तेव्हा त्यांना मोबाईल परत मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने मोबाईल आणुन दिल्यानंतर मी मोबाईल जप्त करुन मुद्देमाल पावती तयार केली. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीकडून मोबाईल जप्त केला नाही. मी पंचाना पंचनाम्याकरीता हजर राहण्यासाठी लेखी निवेदन दिले नव्हते.

४. घटनास्थळाच्या पुर्व बाजुला रस्ता आहे. घटनास्थळाच्या बाजुला दोन घरे आहे. ती घरे कोणाची आहे त्यांची नावे मला सांगता येणार नाही. त्या शेजा-यांनी आरोपीला पाहिले नव्हते त्यामुळे मी त्यांचे जबाब घेतले नाही. घटनास्थळाचा ग्रामपंचायत मिळकत नंबर मला सांगता येणार नाही. घटनास्थळाचा उतारा तपासकामी हस्तगत केला नाही. जप्त मोबाईल पंचनामा करुन फोटो काढून न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीला दिला आहे.

प्रश्न - मोबाईल फिर्यादीला पंचनामा करुन परत केला, त्या पंचनाम्याची प्रत तुम्ही न्यायालयात दाखल केली आहे का ?

उत्तर - दोषारोपपत्र हे पंचनामा करण्यापुर्वी न्यायालयात दाखल केले आहे.

५. आरोपीने तोडून टाकलेले सिमकार्ड मिळाले नाही. सदर मोबाईल हा फिर्यादीचा आहे हे दाखविण्याकरीता मोबाईल खरेदीची पावती फिर्यादीकडून हस्तगत केली नाही. मोबाईलचा आय.एम.ई.आय. नंबर मी वाचुन सांगु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील मोबाईल फिर्यादीने आणुन दिला, सदर मोबाईल आम्ही दोन पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याने जप्त केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर मुद्देमालाची पावती तयार केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी फिर्यादीच्या शेजारी राहणा-या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार लिलाबाई शिवाजी बार्वेकर यांच्याकडे तपास करुन त्यांचा जबाब नोंदविला, त्यानंतर इतर साक्षीदारांकडे तपास करुन त्यांचा जबाब नोंदविला, त्यानंतर मी घटनास्थळ पंचनामा केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही आरोपीला अटक करुन त्याच्याकडे मोबाईलच्या सिमकार्डबाबत तपास केला, आरोपीने सिमकार्ड तोडून फेकून दिले होते, सदर मोबाईल फिर्यादीला परत केला आहे, तपासाअंती आरोपीने मोबाईल चोरीचा गुन्हा केला असे निष्पन्न झाले तसेच आरोपीने मोबाईल पुन्हा फिर्यादीला आणुन दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन न्यायालयात खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०२/०७/ २०२६**
**घोडेगाव**